# ११) संवादाचे स्वरूप

**ह. भ. प. श्री. सुभाष महाराज गेठे**

संवाद म्हणजे व्यक्ती-व्यक्तीतील सहेतुक व अर्थपूर्ण संपर्क, आधुनिक संवादशास्त्राने संवादक्रियेचा विविध प्रकारे बारकाईने विचार केला आहे. सर्वसाधारणपणे एका व्यक्तीकडून इतर व्यक्तींकडे विशिष्ट चिन्हांद्वारे केले गेलेले संदेशाचे प्रक्षेपण असा संवादाचा अर्थ असतो. या प्रक्रियेत संवादक म्हणजे संदेश पाठवणारा प्रेषक, ज्याद्वारे संदेश पाठवायचा ते माध्यम, ज्याच्याकडे तो संदेश स्वीकारला जाणार आहे तो स्वीकारक आणि संदेशाचा स्वीकारकावर झालेला परिणाम या घटकांचा विचार केला जातो.

आधुनिक संवादतत्त्वातील या संकल्पनांच्या अनुषंगाने संत वाङ्मयातील संवादप्रकियेचा विचार इथे करावयाचा आहे.

मध्ययुगीन मराठी वाङ्मयात गद्य संवाद पद्धतीचा वापर महानुभाव लेखकांनी सर्वप्रथम केला हे सर्वश्रुत आहे. पण इथे वारकरी संत परंपरेच्या संवादतत्त्वाचा विचार अभिप्रेत आहे.

संत ज्ञानेश्वर ते संत निळोबा अशा प्रदीर्घकालीन संत वाङ्मयात संवादाचे चार प्रमुख प्रकार दिसून येतात. १) श्रोतृसंवाद, २) मित्रसंवाद, ३) आत्मसंवाद, ४) दोन व्यक्तींचा संवाद. या चारही संवाद पद्धतींचा प्रभावी वापर संत ज्ञानेश्वरांनी सर्वप्रथम केला, हे पहिल्यांदा आवर्जून सांगितले पाहिजे. भावार्थदीपिका ऊर्फ ज्ञानेश्वरी, चांगदेव पासष्टी आणि अमृतानुभव या ज्ञानेश्वरांच्या तीन रचना म्हणजे संवादाचे तीन प्रकार आहेत. ज्ञानेश्वरी हा श्रोतृसंवाद आहे. चांगदेव पासष्टी हा मित्रसंवाद, तर अमृतानुभव हा आत्मसंवाद आहे. प्रसंगोपात दोन

व्यक्तींचे संवाद ज्ञानेश्वरीमध्ये काही ठिकाणी येतात. यातील पहिल्या श्रोतृसंवादाचे स्वरूप आपण पाहू–

**१) श्रोतृसंवाद :** 'संत ज्ञानेश्वर हे स्वभावतःच संवादशील वृत्तीचे होते' असे एक विधान डॉ. वि. रा. करंदीकर यांनी केले आहे. त्याचा पुरेपूर प्रत्यय ज्ञानेश्वरीमध्ये आपल्याला येतो. ज्ञानेश्वरी वाचणाऱ्या कुणालाही ते आपल्याशी बोलत आहेत असा भास होतो. पहिल्या अध्यायापासून ते अठराव्या अध्यायापर्यंत संवादक श्री ज्ञानेश्वर महाराज आपल्या श्रोत्यांशी म्हणजे स्वीकारकांशी सतत संवाद साधत आहेत. हा संवादही मोठा विलक्षण आहे. मुळात संवादरूप असलेल्या भगवद्गीतेचा ज्ञानेश्वरी हा भाष्यग्रंथ. हे गीतातत्त्व श्रोत्यांनी चित्तात अति हळुवारपणा आणून ऐकावे, अशी ते विनंती करतात. कारण हे आत्मतत्त्व शब्दांच्या शिवाय होणारा संवाद आहे. इंद्रियांच्या नकळत अनुभवण्याचा हा विषय आहे. हे कसे शक्य आहे? असा प्रश्न श्रोत्यांच्या मनात येईल, अशी कल्पना करून लगेच सुंदर दृष्टातांनी शंका निरसन करतात. '**जैसे भ्रमर परागु नेती। परी कमळदळे नेणती। तैसी परी आहे सेविती। ग्रंथी इथे।।**' जसे भ्रमर कमलपुष्पातील मकरंदकण हळुवारपणे सेवन करतात, पण कमलदलांना ते समजत देखील नाही– तशी या ग्रंथश्रवणाची पद्धती आहे, असे ते म्हणतात. या पहिल्या अध्यायातल्या उल्लेखापासून लक्षात येते की ज्ञानेश्वरीचा श्रोतावर्ग हा तटस्थ नाही. अत्यंत विलक्षण वृत्तीचा हा श्रोतावर्ग आहे. श्री ज्ञानेश्वरांचे थोरले बंधू आणि गुरू निवृत्तीनाथ या श्रोत्यांमध्ये आहेत. त्यामुळे तर श्री ज्ञानेश्वरांनी वारंवार श्रोतृवंदन केले आहे. '**वक्ता तो वक्ताचि नव्हे । श्रोतेनिविण।।**' असे म्हणून श्रोत्यांचे महत्त्व सांगितले आहे. '**प्रभू तुम्ही महेशाची मूर्ती। आणि मी दुबळा अर्चितसे भक्ती ।**' असे म्हणून श्रोत्यांना भगवंत आणि स्वतःला भक्त असे

संबोधले आहे. श्रोत्यांना माय-बाप संबोधून स्वतःला अपत्य असे म्हटले आहे. श्री ज्ञानेश्वरांची विनम्रता, विनयशीलता आणि आत्मविश्वास यांचा जागोजागी प्रत्यय या श्रोतृसंवादात येतो.

आपल्या श्रोत्यांनी गीतातत्त्व समजून घेण्यासाठी अर्जुनाप्रमाणे एकचित्त अवधान द्यावे, हे सांगताना श्री ज्ञानेश्वर म्हणतात, **'अहो अर्जुनाचिये पांती। परिसणेया योग्य होती। तिही कृपा करुनि संती। अवधान द्यावे।।'** अर्जुनाच्या पंगतीला बसण्याची ज्याची योग्यता असेल त्यानेच ही गीत-ज्ञानेश्वरी ऐकावी अशी विनंती ते करतात. पण या बोलण्यात श्रोत्यांना काही वेगळा अर्थ जाणवेल हे लक्षात घेऊन लगेच म्हणतात- **'हे सलगी म्यां म्हणितले। चरणां लागूनि विनविले। प्रभू सखोल हृदय आपुले। म्हणौनिया।।'** आपल्या या बोलण्यात दर्प किंवा उन्मत्तपणा नाही. श्रोतेहो, हे मी प्रेमाने बोलत आहे. आपण अर्जुनाच्याच काय प्रत्यक्ष श्रीकृष्णाच्या योग्यतेचे आहात. **'जैसा स्वाभावो मायबापांचा। अपत्य बोले जरी बोबडी वाचा। तरी अधिकचि तयाचा। संतोष आथी ।।'** आपले मूल जरी बोबडे बोलले तरी त्याचा आई-बापांना संतोष होतो, तसा तुम्ही सज्जनांनी माझा अंगीकार केला आहे. असे स्वतःकडे तान्हेपण घेत श्री ज्ञानेश्वर श्रोत्यांशी संवाद साधत आहेत. श्रोत्यांना ते 'श्रीमंत माहेर' म्हणतात, त्यांचा सूत्रधार असा उल्लेख करून स्वतःला कळसूत्री बाहुले म्हणतात. श्रोत्यांना स्वामी आणि स्वतःला पाईक म्हणजे सेवक म्हणतात. चंद्र, परीस, कामधेनू, कल्पतरू, चिंतामणी अशा उपमा देऊन श्रोत्यांचा गौरव करतात.

ज्ञानेश्वरांचा हा श्रोतृसंवाद अत्यंत आगळावेगळा आहे. मराठीत तर नाहीच, पण संस्कृत काव्यग्रंथातही अशी श्रोतृसंवादाची पूर्वपरंपरा नाही. ज्ञानेश्वरांच्या नंतरच्या कवींनी श्रोतृस्तवन केलेले आहे, पण

त्यात सांकेतिकता आहे. तेव्हा श्रोतृसंवाद हा ज्ञानेश्वरांच्या प्रतिभेचा स्वतंत्र आविष्कार आहे.

पण इथे संवादतत्त्वाच्या दृष्टीने ज्ञानेश्वरांच्या श्रोतृसंवादाचे एक ठळक वैशिष्ट्य सांगायचे आहे. ज्ञानेश्वरीत श्री ज्ञानेश्वर श्रोत्यांशी बोलतातच, पण श्रोतेही श्री ज्ञानेश्वरांशी बोलत असतात. हे संवादनाट्य मोठे वेधक आहे. ज्ञानेशांचे विषय प्रतिपादन ऐकून श्रोते समाधान व्यक्त करतात, त्यांचे मनमोकळे कौतुक करतात, कधी विषयांतर होताना दिसले की मधेच थांबवून त्यांना मूळपदावर आणतात, तर कधी परखड टीकाही करतात. तेराव्या अध्यायातला एक भाग त्या दृष्टीने पाहण्यासारखा आहे. (ओवी क्र. ३१२ ते ३३७) इथे श्रोत्यांनी सलग १६ ओव्यांमध्ये आपला अभिप्राय व्यक्त केला आहे. या अभिप्रायात श्री ज्ञानेश्वरांची प्रशंसा आहे, तशीच परखड टीकाही आहे. **‘तव श्रोते म्हणितले असो। न सांगतियाचा अतिसो। ग्रंथोक्ती तेथ आडसो। घालिसी का?।।’** गीतेत न सांगितलेल्या विषयाचा विस्तार करून श्री ज्ञानेश्वर ग्रंथोक्तीला अडसर घालीत आहेत, असा श्रोत्यांचा पहिला आक्षेप आहे. पण दुसरा आक्षेप अधिक गंभीर आहे, अनौचित्याचा, **‘रसू होआवा अतिमात्रु। हा घेतासि कविमंत्रु। तरि अवंतूनि शत्रू । करितोसि का गा?।।’** श्रोते म्हणतात, ज्ञानेश्वरा, तू रसाच्या अतिरिक्त हव्यासाने अनैचित्याला बळी पडत आहेस. पूर्वकवींनी असा प्रकार केला आहे आणि आम्हाला आमंत्रण देऊन, हा तुझा दोष आमच्या तोंडून वदवून, तू आम्हाला शत्रू करतोस का काय? अर्थात् हे आक्षेप नोंदवूनही श्रोत्यांना श्री ज्ञानेश्वरांचा हिरमोड करायचा नाही. ते श्री ज्ञानेश्वरांची प्रशंसाही करतात आणि पुढे विषय सुरू करण्यास सांगतात. त्यावर श्री ज्ञानेश्वरांचे उद्‌गार आहेत. **‘या संत वाक्यासरिसे। म्हणितले निवृत्तिदासे। माझेही जी ऐसे। मनोगत।। यावरी आता तुम्ही। आज्ञापिला**

**स्वामी। वाया वाग मी। वाढो नेदी।।**' 'श्रोते हो, आता यापुढे मी व्यर्थ शब्द वाढू देणार नाही.'

ज्ञानेश्वरीत असे अनेक श्रोतृसंवाद आहेत. श्री ज्ञानेश्वरांच्या अहंकारशून्य व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार घडवणारे हे संवाद आहेत. **'किंबहुना तुमचे केले। धर्मकीर्तन हे सिद्धी गेले। येथ माझे जी उरले। पाईकपण।।**' असे म्हणून आपल्या ग्रंथनिर्मितीचे श्रेय आपले गुरू आणि श्रोत्यांना देऊन टाकतात. डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी याचे फार सुंदर वर्णन केले आहे- ज्ञानेश्वरीची पालखी गुरू आणि श्रोते वाहून नेतात, तिच्यात गीतेची प्रतिष्ठापना झालेली असते आणि स्वतः श्री ज्ञानेश्वर रस्त्याच्या कडेला अगदी निःसंगपणे उभे असतात! (ज्ञानेश्वरांचे श्रोतृसंवाद पृ. १८) असो.

पुन्हा आपण संवादतत्त्वाकडे येऊ. श्री ज्ञानेश्वरांचे श्रोतृसंवाद एकतर्फी नाहीत, दुतर्फी आहेत. म्हणजे श्री ज्ञानेश्वर श्रोत्यांशी बोलतात तसे श्रोतेही त्यांच्याशी बोलतात. श्रोत्यांना बोलके करण्याचे कसब श्री ज्ञानेश्वरांच्या वक्तृत्वात आहे आणि हे संवाद-नाट्य पाहून खरोखरच आपण अचंबित होतो!

**२) मित्रसंवाद :** श्री ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयात 'चांगदेव पासष्टी' नावाचे केवळ पासष्ट ओव्यांचे एक काव्य आहे, ते मित्रसंवादाचे एक अप्रतिम उदाहरण म्हणता येईल. खरे म्हणजे ते एक ओवीबद्ध पत्र आहे. ह्या पत्राची पार्श्वभूमी आपल्याला माहीत असणारी आहे. कथा अशी, पैठणला असताना रेड्याच्या तोंडून वेद वदवण्याचा चमत्कार श्री ज्ञानेश्वरांनी केला. तो कानावर आल्यावर अशा अधिकारी पुरुषाच्या भेटीला जाण्यापूर्वी त्यांना एक पत्र पाठवून श्री ज्ञानेश्वरांचा काय प्रतिसाद येतो ते पाहावे असे ठरले. चांगदेवांनी पत्र लिहायचे ठरवले, पण मायना काय लिहावा असा त्यांना प्रश्न पडला. म्हणजे वयाने

लहान म्हणून 'आशीर्वाद' लिहावे की अधिकाराने मोठे म्हणून दंडवत लिहावे. म्हणून कोरा कागदच श्री ज्ञानेश्वरांकडे पाठवून दिला. या कोऱ्या कागदावर ज्ञानदेवांनी पासष्ट ओव्यांचे पत्र लिहून पाठवले. हे पत्र म्हणजे 'चांगदेव पासष्टी.' जवळच्या मित्राशी हितगुजाच्या स्वरूपात मनोगत व्यक्त करणारे असे हे पत्र आहे. म्हणूनच याला मित्रसंवाद असे म्हणायचे. 'तत्त्वमसि' या महावाक्याचा सूत्रबद्ध तत्त्वविचार श्री ज्ञानेश्वर लालित्यपूर्ण पद्धतीने या पत्रातून मांडतात. नामरूपात्मक जगताचे अधिष्ठान ब्रह्माहून वेगळे नाही. सोने हे सोनेपणाच्या कसात कमी न होता जसे अलंकाररूपात येते तसे परब्रह्म हे आपल्या पूर्णत्वात कमी न होता विश्वरूपाने विलसते, हा सिद्धान्त सांगून पुढे त्याचा विस्तार श्री ज्ञानेश्वर करतात. अद्वैताचा उपदेश आणि चांगदेवांबद्दलची मित्रत्वाची भावना यांचे मिश्रण साधण्याची किमया ते साधतात. हा संवाद कोणत्या प्रकारचा आहे? तर **'चांगया मज तुझ आपणयाचा। बोल ऐके ।'** असे श्री ज्ञानेश्वर म्हणतात. तुझ्या–



माझ्यामधे ऐक्यभाव असल्यामुळे हे माझे तुला उपदेश करणे म्हणजे आपलाच उपदेश आपण ऐकण्यासारखे आहे. पुढे ते म्हणतात, **सखया तुझेनि उद्देशे। भेटावया जीव उल्हासे। की सिद्धभेटी विसकुसे। ऐशिया बिहे।।** तुला भेटावे अशी खूप इच्छा आहे, पण अद्वैताच्या भूमिकेवरून जी आधीच सिद्ध-भेट झाली आहे तिला ढळ पोचेल, असे मनाला भय वाटते, असे श्री ज्ञानेश्वर म्हणतात, **'एवं ज्ञानदेव चक्रपाणी ऐसे। दोन्ही डोळस आरसे। परस्पर पाहता कैसे। मुकले भेदा।।'** अद्वैतानुभवात रंगलेल्या सिद्ध पुरुषांच्या मित्रसंवादाचे हे चित्रण अत्यंत हृद्य स्वरूपाचे आहे.

मित्रसंवादाचे असेच एक हृद्य उदाहरण म्हणजे संत नामदेवांचे तीर्थावळीचे अभंग. श्री ज्ञानेश्वरांनी नामदेवांसोबत तीर्थयात्रा करण्याची इच्छा प्रकट केली आणि हे दोघे तीर्थयात्रेला निघाले. या तीर्थयात्रेत श्री ज्ञानेश्वर आणि श्री नामदेव यांचा संवाद झाला. या संवादातून भक्तियोगाचे अवघे प्रायोगिक तत्त्वज्ञान जिवंतपणे प्रगटले आहे.

**३) आत्मसंवाद :** संतवाङ्मयातल्या संवादाचा तिसरा प्रकार म्हणजे आत्मसंवाद. स्वतःच स्वतःशी केलेला संवाद आणि याचीही सुरुवात श्री ज्ञानेश्वरांनी 'अमृतानुभव' या ग्रंथातून केली. अमृतानुभवात कुठेही श्रोत्यांचे उल्लेख नाहीत. प्रारंभीच्या वंदनात विस्ताराने गुरूंचा उल्लेख येतो, पण गुरू समोर उपस्थित नाहीत. कोणी समानधर्म मित्रही नाही. स्वतःच्या अनुभवाच्या प्रकटीकरणासाठी हा ग्रंथ श्री ज्ञानेश्वर लिहितात.

संत वाङ्मयात संत नामदेवांपासून तुकोबांपर्यंत आत्मसंवादाची अनेक उदाहरणे आढळतात. परमेश्वरभक्तीची ओढ आणि परमेश्वर प्राप्तीचा आनंद व्यक्त करणारे अभंग ही आत्मसंवादाचीच उदाहरणे आहेत. **'तुका म्हणे होय मनासी संवाद। आपुलाचि वाद आपणासी ।।'** या चरणात श्री तुकाराम महाराजांनी हे ठळकपणे सांगितले आहे.

भक्त आणि परमेश्वर संवादाचे अभंगही या प्रकारातच समाविष्ट केले पाहिजेत.

**४) व्यक्ती-व्यक्तीतील संवाद :** दोन व्यक्तींमधील संवाद चित्रण करून एक नाट्य निर्माण करायचे आणि त्यातून काही उपदेश द्यायचा असा संवादाचा एक प्रकार संत वाङ्मयात दिसतो. ज्ञानेश्वरीत सहाव्या अध्यायाच्या प्रारंभी संजय आणि धृतराष्ट्र यांचा संवाद रंगवून श्री ज्ञानेश्वरांनी एक वेगळीच खुमारी निर्माण केली आहे. अशा संवादातून व्यक्तिचित्रे निर्माण होतात. आणि काही तत्त्वबोधही देता येतो. संत एकनाथांची भारुडे आणि गौळणींमधे अशी अनेक उदाहरणे आहेत. 'हिंदु-तुर्क संवाद' या नाथांच्या भारुडाचा या संदर्भात आवर्जून उल्लेख करता येईल.

**समारोप :** संत वाङ्मयातील प्रमुख संवाद प्रकारांचे स्वरूप आपण समजून घेतले. आधुनिक संवादशास्त्राच्या कसोट्याही अपुऱ्या पडतील इतकी विविधता संत वाङ्मयातील संवादामध्ये आहे. पण संत वाङ्मयातले संवाद हे वेगवेगळे पवित्रे आहेत हे समजून घेतले पाहिजे. हे संवाद रंगवून संतांना समाजाला अध्यात्मशास्त्राची भक्तियोगाची शिकवण द्यायची आहे.